**महाराष्ट्र शासन**

**स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय, महाराष्ट्र राज्य,**

**कोकण भवन, सहावा मजला, नवी मुंबई ४०० ६१४**

☎/ 🖷:--०२२,२७५७१३११. Website: www.mahalfa.in E.Mail:ad.admin@mahalfa.in

क्र.स्था-१८ /ब/परिपत्रक / सलेपअ /अहवाल/ ७२९२ दिनांकः- 31 JUL 2012

## आदेश

विषयः-स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालयांतर्गत गठीत करावयाची " विचारविमर्ष " समिती.

स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालयाकडून राज्यभरातील विभागीय आणि जिल्हा स्तरीय कार्यालयाच्या स्तरावर विविध ग्रामीण आणि नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या लेखापरीक्षणाचे काम केले जाते. ज्या संस्थांचे लेखापरीक्षण करावयाचे आहे त्या संस्थांची कार्यपध्दती ज्या नियम, अधिनियम आणि शासन निर्णयानुसार नियंत्रित केली जाते ते नियम व अधिनियम विचारात घेऊन लेखापरीक्षणाचे काम करावे लागते. सदरचे काम हे अधिक सुलभतेने आणि निर्दोष पध्दतीने होण्यासाठी या कामकाजासंबंधी काही उपयुक्त सूचना क्षेत्रिय स्तरावरील प्रत्यक्ष काम करणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांचेकडून झाल्यास ते विभागीय कामकाजाच्या कार्यक्षमतेच्या दृष्टीने अधिक सोयीचे आणि उपयुक्त ठरु शकेल.

वरील बाब विचारात घेऊन अशा प्रकारच्या सुचना करण्यासाठी ,उपाय सुचविण्यासाठी क्षेत्रिय स्तरावरील अधिकारी व कर्मचारी यांची एक " विचारविमर्ष समिती" गठीत करण्याचे ठरविण्यात आले आहे. सदर समिती मध्ये खालील प्रमाणे अधिकारी /कर्मचारी यांचा समावेश करण्यात येत आहे.

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे नाव | पदनाम | समितीमधील पद |
|---|---|---|---|
| १ | श्री.अ.सो.वाघवसे | सह संचालक,<br>स्थानिक निधी लेखापरीक्षा, मुंबई विभाग. | अध्यक्ष |
| २ | श्री.संजय शहा | सह संचालक,<br>स्थानिक निधी लेखापरीक्षा, पुणे | उपाध्यक्ष |
| ३ | श्री.चं.बा.बिवलकर | सहसंचालक,स्थानिक निधी लेखापरीक्षा (मनपा) | उपाध्यक्ष |
| ४ | श्री.उ.ग्या.चव्हाण | उपसंचालक,<br>स्थानिक निधी लेखापरीक्षा, ठाणे | सदस्य |
| ५ | श्री.शै.गो.पाटील | सहाय्यक संचालक,<br>स्थानिक निधी लेखापरीक्षा, ठाणे | सदस्य सचिव |
| ६ | श्री.शि.बा.नाईकवाडे | सहाय्यक संचालक,<br>स्थानिक निधी लेखापरीक्षा, धुळे | सदस्य |
| ७ | श्री.प्र.वि.डाके | सहाय्यक संचालक,<br>स्थानिक निधी लेखापरीक्षा, नांदेड | सदस्य |